प्रेसनोट

दि.२१/०१/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | भिंगार कॅम्प पो.स्टे.,जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)विशाल सुखदेव भोर, वय ३४ वर्ष, राज्य कर निरीक्षक, वर्ग २, वस्तु व सेवा कर कार्यालय, अहमदनगर रा.साईनगर, भुषणनगर, केडगांव, अहमदनगर<br>२)निलेश म्हातारबा बांगर, वय २८ वर्ष, कर सल्लागार (खाजगी इसम), रा.रानमळा, बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १५,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १५,०००/- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे कृषी सेवा केंद्राचे जीएसटी खाते काढलेले होते. परंतु मागील दोन वर्षापासुन त्यांचा व्यवसाय बंद होता, त्यांना आकारण्यात आलेला दंड १,१३,०००/- रुपये न भरता त्यांचे जीएसटी खाते बंद करण्यासाठी आरोपी लोकसेवक विशाल सुखदेव भोर यांनी दि. २०/०१/२०२० रोजी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रुपये मागणी करुन तडजोडअंती १५,०००/- रुपये लाच मागणी करुन सदरची रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम आरोपी नं.२ निलेश म्हातारबा बांगर, कर सल्लागार यांचेकडे देण्यास सांगितली. त्यानुसार आरोपी नं.२ श्री.बांगर यांचे बेल्हे, ता.जुन्नर येथील बांगर असोसिएटस या कार्यालयात आज दि. २१/०१/२०२० रोजी आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी नं.२ श्री.बांगर यांनी लाचेची रक्कम १५,०००/- रुपये पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले आहे. तसेच लाच रक्कम स्वीकारले नंतर अहमदनगर येथील वस्तु व सेवा कर कार्यालयातील आरोपी लोकसेवक श्री.विशाल भोर यांनाही ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

(दीपक करांडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner